लोकमत

# हॅलो कोल्हापूर

शनिवार, दि. २२ ऑक्टोबर २०१६

**धनंजय महाडिक : लघु-मध्यम उद्योजकांची आयात-निर्यातविषयक कार्यशाळा**

# उद्योजकांनी देशाची सीमा ओलांडावी

**कोल्हापूर :** जागतिक बाजारपेठेत आपल्या देशाच्या उत्पादनांना अधिक मागणी आहे. आपल्या उद्योजकांमध्ये क्षमता आहे; पण त्यांनी स्वत:ला एक मर्यादा घालून घेतली आहे. त्यांनी निर्यातीचे धाडस करुन विकासासाठी देशाची सीमा ओलांडण्याची गरज आहे, असे प्रतिपादन खासदार धनंजय महाडिक यांनी शुक्रवारी येथे केले.

येथील 'एसएमई मॅन्युफॅक्चरर्स अँड एक्स्पोर्टर्स समिट' या परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. महाराष्ट्र इंडस्ट्रियल अँड इकॉनॉमिक डेव्हलपमेंट असोसिएशन आणि एसएमई चेंबर ऑफ इंडियातर्फे लघु व मध्यम उद्योजकांचा विकास व निर्यातवाढीसाठी परिषद घेण्यात आली. हॉटेल सयाजीमधील या कार्यक्रमास घोडावत एनर्जी प्रायव्हेट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक श्रेणिक घोडावत, एसएमई चेंबर ऑफ इंडियाचे अध्यक्ष चंद्रकांत साळुंखे प्रमुख उपस्थित होते.

खासदार महाडिक म्हणाले, कौशल्यपूर्ण व दर्जेदार उत्पादन निर्मितीची क्षमता असणाऱ्या कोल्हापुरातील उद्योजकांनी ग्लोबल व्हावे. त्यांना जगभरात अनेक संधी उपलब्ध असून ते साधण्याच्या दृष्टीने कार्यरत राहावे. यासाठी उद्योजकांनी 'एसएमई'ची मदत घ्यावी.

व्यवस्थापकीय संचालक घोडावत म्हणाले, उद्योजकांनी पाच वर्षांचा आराखडा डोळ्यांसमोर ठेवून वाटचाल करावी. स्वत:चा ब्रँड विकसित करताना संबंधित देश लक्षात घ्यावा. जागतिक बाजारपेठेत कोल्हापूरचा ठसा उमटवायचा असल्यास उद्योजकांना बळ देण्यासाठी लोकप्रतिनिधींनी पुढाकार घ्यावा.

अध्यक्ष साळुंखे म्हणाले, जगातील ४६ देशांशी एमएमई चेंबर ऑफ इंडिया कार्यान्वित आहे. जानेवारीमध्ये 'वेस्टर्न महाराष्ट्र इन्व्हेस्टमेंट समिट- डेस्टिनेशन कोल्हापूर' घेण्यात येईल. कार्यक्रमास 'एसएमई'चे संचालक महेश साळुंखे, आदींसह कोल्हापूर, सांगली, इस्लामपूर परिसरातील उद्योजक उपस्थित होते.

दरम्यान, उद्घाटनानंतरच्या सत्रात बॉम्बे स्टॉक एक्स्चेंजमधील 'एसएमई'चे प्रमुख अजय ठाकूर, स्टेट बँक ऑफ इंडियामधील 'एसएमई'चे जी. एस. राणा, 'एसआयडीबीआय'चे कोल्हापूर विभागीय व्यवस्थापक भगवान चंदाणी, ईसीजीसी लिमिटेडचे अफसाना शेख, पुण्यातील स्टेट बँक ऑफ इंडियाचे व्यवस्थापक सचिन तिजारे यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. (प्रतिनिधी)

दीपक जाधव




कोल्हापुरात शुक्रवारी 'एसएमई मॅन्युफॅक्चरर्स अँड एक्स्पोर्टर्स समिट' या परिषदेचे उद्घाटन खासदार धनंजय महाडिक यांच्या हस्ते झाले. यावेळी डावीकडून अमिताभ सिन्हा, जी. एस. राणा, श्रेणिक घोडावत, चंद्रकांत साळुंखे, अजय ठाकूर, महेश साळुंखे उपस्थित होते.

## नियोजनबद्ध प्रयत्न करावेत

चिनी वस्तूंना विरोध वाढत असल्याने जगात आपला देश 'नेक्स्ट डेस्टिनेशन' म्हणून भविष्यात निश्चितपणे पुढे येणार आहे. ते लक्षात घेऊन उद्योजकांनी पुढे यावे, असे आवाहन खासदार महाडिक यांनी केले. ते म्हणाले, सामूहिक शेती अथवा शेतकऱ्यांनी एकत्रित यावे. उद्योजकांनी संघटित व्हावे. उत्पादनाचे मार्केटिंग करण्यासह दर्जेदार उत्पादनांची संख्यात्मक मागणी पूर्ण करण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न करावेत.

www.maharashtratimes.com

एकमेव निष्पक्ष वृत्तपत्र

महाराष्ट्र टाइम्स

कोल्हापूर, शनिवार, २२ ऑक्टोबर २०१६ ◆ पाने २० (कोल्हापूर टाइम्ससह) ◆ शहर आवृत्ती ◆ रुपये ३.००

# उद्योजकांनी निर्यातीसाठी धाडस करावे

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**



धनंजय महाडिक

'आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत भारताला सध्या सर्वाधिक संधी आहे. चिनी वस्तूंना दर्जामुळे विरोध होत असल्याने भारतातील उत्पादकांना मागणी वाढत आहे. त्यामुळे आता उद्योजकांनी निर्यातीसाठी धाडस करण्याची गरज आहे,' असे मत खासदार धनंजय महाडिक यांनी आज येथे व्यक्त केले.

महाराष्ट्र इंडस्ट्रीयल आणि इकॉनॉमिक डेव्हलपमेंट असोसिएशन तसेच एसएमई चेंबर ऑफ इंडिया यांच्यावतीने लघू व मध्यम उद्योजकांच्या विकास व निर्यातवृद्धीसाठी 'एसएमई मॅन्युफॅक्चरर्स अॅन्ड एक्स्पोर्टस् समिट'चे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी खासदार महाडिक बोलत होते. एसएमई चेंबर ऑफ इंडियाचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत साळुंखे, उद्योजक श्रेनिक घोडावत व्यासपीठावर प्रमुख उपस्थित होते.

**एक्स्पोर्टस् समिट'मध्ये महाडिक यांचा सल्ला**

हॉटेल सयाजी येथे झालेल्या समिटमध्ये कोल्हापूरसह पश्चिम महाराष्ट्रातील सुमारे दीडशे लघू व मध्यम उद्योजक सहभागी झाले होते. कार्यक्रमात उद्योजकांना मेक इन इंडिया, भारतीय उद्योजकांसाठीच्या संधी व आव्हाने, अर्थ पुरवठ्या संदर्भात बँकांची भूमिका तसेच निर्यात बाजारातील फायदे याविषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

खासदार महाडिक म्हणाले, 'चिनी वस्तूंना मोठ्या प्रमाणावर विरोध होत असल्याने भारतासारख्या देशाचा नेक्स्ट डेस्टिनेशन म्हणून पुढे येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.'

घोडावत म्हणाले, 'आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कोल्हापूरचा ठसा उमटवायचा असेल, तर स्थानिकांनी विशेषत: लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेणे गरजेचे आहे.' एसएमई चेंबर ऑफ इंडिया गेली २३ वर्षे उद्योजक विकासाचे काम करत असून, यामध्ये कुशल मनुष्यबळापासून निर्यातीसाठी मार्गदर्शन करण्यापर्यंत उद्योजकांना मदत केली जात असल्याचे साळुंखे यांनी सांगितले.

विविध सत्रांमध्ये तज्ज्ञांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. स्टेट बँक ऑफ इंडियाचे डीजीएम (एसएमई) जी. एस. राणा यांनी 'बँका उद्योजकांना अर्थपुरवठा करण्यास तयार असून, त्यांच्यापर्यंत उद्योजकांच्या गरजा पोहोचणे गरजेचे आहे,' असे मत व्यक्त केले.



एसएमई चेंबर ऑफ इंडिया यांच्या वतीने सयाजी हॉटेल येथे झालेल्या 'एसएमई मॅन्युफॅक्चरर्स अॅन्ड एक्स्पोर्टस् समिट'मध्ये उपस्थित उद्योजक.

## जानेवारीत गुंतवणूक परिषद

कोल्हापुरात येत्या जानेवारीमध्ये वेस्टर्न महाराष्ट्र इनव्हेस्टमेंट समिट-डेस्टिनेशन कोल्हापूर आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती एसएमई चेंबर ऑफ इंडियाचे अध्यक्ष चंद्रकांत साळुंखे यांनी महाराष्ट्र टाइम्सशी बोलताना दिली. यामध्ये पश्चिम महाराष्ट्रात विशेषत: कोल्हापुरात गुंतवणुकीला कशी चालना मिळेल, या संदर्भात चर्चा केली जाणार आहे, असे साळुंखे यांनी सांगितले.

TODAY
कोल्हापूर परिसर
सकाळ
कोल्हापूर, शनिवार,
२२ ऑक्टोबर २०१६


# कोल्हापूरच्या उद्योजकांनी ग्लोबल व्हावे

## खासदार धनंजय महाडिक : ‘एसएमई मॅन्युफॅक्चरर्स अँड एक्स्पोर्टस् समिट’ परिषदेचे उद्‌घाटन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २१ : कोल्हापुरातील उद्योजकांमध्ये कार्यक्षमता आहे; पण या क्षमतेला त्यांनी मर्यादा घालून घेतली आहे. याच क्षमतेच्या जोरावर त्यांनी विकासासाठी देशाची सीमा ओलांडली पाहिजे, कोल्हापुरातील उद्योजकांना आता मात्र ग्लोबल झाल्याशिवाय पर्याय नाही, असे आवाहन खासदार धनंजय महाडिक यांनी आज केले. सयाजी हॉटेलमध्ये ‘एसएमई मॅन्युफॅक्चर्स अँड एक्स्पोर्टस् समिट’ परिषदेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते.


धनंजय महाडिक

महाराष्ट्र इंडस्ट्रियल अँन्ड इकॉनॉमिक डेव्हलपमेंट असोसिएशन आणि एसएमई चेंबर ऑफ इंडियातर्फे झालेल्या परिषदेसाठी घोडावत एनर्जी प्रायव्हेट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक श्रेणिक घोडावत, बॉम्बे स्टॉक एक्स्चेंजमधील एसएमईचे प्रमुख अजय ठाकूर, एमएमई चेंबर ऑफ इंडियाचे अध्यक्ष चंद्रकांत साळुंखे उपस्थित होते.

खासदार महाडिक म्हणाले, ‘‘कोल्हापुरात चांगला उद्योग आणि उद्योजक आहेत. कौशल्यपूर्ण उद्योग ही कोल्हापूरची खासियत आहे. दर्जेदार उत्पादन निर्मितीची क्षमता असणाऱ्या कोल्हापुरातील उद्योजकांना आता मात्र ग्लोबल झाल्याशिवाय पर्याय नाही. देश-विदेशात अनेक संधी उपलब्ध आहेत; पण या संधी साधण्याच्यादृष्टीने उद्योजकांनी पुढाकार घेतला पाहिजे. कोणत्याही उद्योगाची प्रगती झाली पाहिजे, यासाठी एसएमईची मदत घेतली पाहिजे. उद्योजकांना भेडसावणाऱ्या सर्व समस्यांबाबत माहिती दिल्यास त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करू.’’

### शेती उत्पादनाला चांगली मागणी

**कोल्हापुरातील शेती व औद्योगिक क्षेत्राला विदेशातही मागणी आहे. या सर्वांची संख्यात्मकदृष्टी असलेली मागणी पूर्ण करणे येथील उद्योजकांना शक्य नाही. याशिवाय शेतकऱ्यांनी सामूहिक शेती अथवा शेती करणाऱ्यांनी एकत्रित यावे. यामुळे परदेशातील मागणीनुसार आपल्याला पुरवठा करण्यास मदत होणार आहे.**

श्रेणिक घोडावत म्हणाले, ‘‘सध्या विविध उत्पादने बाजारात येत आहेत. एकच कंपनी दहा उत्पादने बाजारात आणते. त्याऐवजी एक उत्पादन दहा बाजारपेठांमध्ये कसे पोचेल याकडे लक्ष दिले पाहिजे. आपल्या व्यवसायाचा किमान पाच वर्षांचा आराखडा डोळ्यांसमोर ठेवून वाटचाल करावी. स्वत:चा ब्रॅंड विकसित करताना संबंधित देश लक्षात घ्यावा.’’

अध्यक्ष साळुंखे म्हणाले, ‘‘स्टार्ट अप व स्टॅंड अप इंडियाच्या माध्यमातून तरुण उद्योजकांना मदतीचा हात दिला जाईल. तरुणांनी उद्योगाकडे सकारात्मकरीत्या प्रयत्न केले पाहिजेत. जगातील देशांशी आयात-निर्यातीच्या सुविधा, मार्गदर्शन एसएमईद्वारे उपलब्ध करून दिले जाईल.’’

या वेळी एसएमईचे संचालक महेश साळुंखे आदींसह कोल्हापूर, सांगली, इस्लामपूर परिसरातील उद्योजक उपस्थित होते. दुसऱ्या सत्रात बॉम्बे स्टॉक एक्स्चेंजमधील एसएमईचे प्रमुख ठाकूर, स्टेट बॅंक ऑफ इंडियामधील एसमएईचे जी. एस. राणा, एसआयडीबीआयच्या कोल्हापूर विभागीय व्यवस्थापक भगवान चंदाणी, ईसीजीसी लिमिटेडचे अफसाना शेख, पुण्यातील स्टेट बॅंक ऑफ इंडियाचे व्यवस्थापक सचिन तिजारे यांनी मार्गदर्शन केले.